Pune Police

# प्रेस नोट

## सहायक पोलीस निरीक्षक प्रेमा पाटील यांनी रिनिंग मिसेस इंडिया २०१९ ही स्पर्धा जिंकलेबाबत

सहायक पोलीस निरीक्षक प्रेमा विघ्नेश पाटील यांनी सौंदर्य आणि बुध्दीमत्तेच्या जोरावर स्वतःला सिध्द करत रिनिंग मिसेस इंडिया २०१९ हा मानाचा किताब पटकवला. मोनिका शेख यांनी रिनिंग मिसेस इंडिया २०१९ ही सौंदर्य स्पर्धा आयोजित केली होती. बाणेर येथील ऑर्किड हॉटेल येथे दिनांक १४/०७/२०१९ रोजी या स्पर्धेची अंतिम फेरी पार पडली.

प्रेमा पाटील या मुळच्या कराड येथील असुन त्यांनी एम.कॉम पर्यंत शिक्षण घेतले आहे. महाराष्ट्र पोलीस दलात मागील ९ वर्षापासुन पोलीस अधिकारी म्हणुन काम करत असुन सध्या त्या विशेष शाखा, पुणे शहर येथे कार्यरत आहेत. या व्यतिरीक्त कार्बोनरी या सामाजिक संस्थेशी सलग्न असुन संस्थेकडुन केल्या जाणा-या सामाजिक कामामध्ये त्या सहभागी असतात. पुण्यातील व पुण्याच्या जवळपास असलेल्या गावातील गरजु गरीब मुलांना शिकविण्याचे ही काम त्या करतात.

जी २० समिट वरचे प्रेझेन्टेशन, नृत्य आणि हजरजबाबीपणा यामुळे त्या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट ठरल्या. परेड मार्च ते रॅम्प वॉक हा त्यांचा प्रवास सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे.

दिनांक – १५/०७/२०१९

जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर


Just now
Congratulations Mrs India
REPLY

